अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. ११ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १६१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## अश्विनची जादू; ऑस्ट्रेलियाचा डाव ४८० धावांवर संपला




मुंबई : उस्मान ख्वाजा आणि कॅमरुन ग्रीन यांच्या दमदार शतकाच्या बळावर ऑस्ट्रेलियाने अहमदाबाद कसोटीच्या पहिल्या डावात ४८० धावांचा डोंगर उभारला. भारताकडून आर अश्विन याने सर्वाधिक सहा विकेट घेतल्या. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा टीम इंडियाने बिनबाद ३६ धावा केल्या आहेत.

रोहित शर्मा १६ तर शुभमन गिल १७ धावांवर खेळत आहेत. भारत अद्याप ४४४ धावांनी पिछाडीवर आहे. उस्मान ख्वाजा याने १८० धावांची संयमी खेळी केली. उस्मान ख्वाजा याने ४२२ चेंडूचा सामना करताना २१ चौकारांच्या मदतीने १८० धावा केल्या. उस्मान ख्वाजाशिवाय कॅमरुन ग्रीन याने ११४ धावांची खेळी केली. या खेळीदरम्यान ग्रीन याने १८ चौकार लगावले. त्याशिवाय मर्फीने ३४ धावांची निर्णायक खेळी केली. तर ट्रॅविस हेड ३२, स्मिथ ३८ यांनीही मोलाचं योगदान दिले. उस्मान ख्वाजा आणि कॅमरुन ग्रीन यांची द्विशतकी भागिदारी हे ऑस्ट्रेलियाच्या डावाचे वैशिष्ट्य ठरले. ख्वाजा आणि ग्रीन यांनी ३५८ चेंडूत २०८ धावांची भागिदारी केली.

मागील दहा ते १५ वर्षातील भारतामधील ही सर्वात विदेशी संघाची सर्वात मोठी भागिदारी आहे. त्याशिवाय लायन आणि मर्फी यांनी नवव्या विकेटसाठी ७० धावांची भागिदारी करत भारताची डोकेदुखी वाढवली.

# ई पॉस मशीनद्वारे केंद्राचा फतवा
# जात दाखवा अन् खत मिळवा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**तुम्ही शेतकरी आहात...? तुम्ही शेती करता..? तुम्हाला पिकांसाठी रासायनिक खते हवी आहेत...? त्यासाठी पैसे तर द्यावेच लागतील, फुकट काही मिळणार नाही. पण त्याआधी तुमची जात दाखवा; त्यानंतरच हवे ते खत मिळवा, असा नवा फतवा केंद्र सरकारने ई पॉस मशीनद्वारे काढला असून त्याची अंमलबजावणी सांगली जिल्ह्यातून सुरू झाली आहे. पुरोगामी महाराष्ट्रात खत खरेदीसाठी जात विचारली जात असल्याने शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत आहे. याचे पडसाद शुक्रवारी विधिमंडळात उमटल्यानंतर सत्ताधारी आणि विरोधक आमनेसामने आले. आरोपप्रत्यारोपांच्या फैरी झडल्यानंतर सत्ताधाऱ्यांनी केंद्र सरकारकडे बोट दाखवत याबाबत केंद्राला कळवणार असल्याचे खुद्द मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केल्यानंतर विधिमंडळातील गोंधळ थांबला.**

शुक्रवारी सर्वप्रथम विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी हा मुद्दा विधानसभेत उपस्थित करताच सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी सुरू झाली. खत खरेदी करताना जात विचारण्याचे कारण काय? हे सरकारने स्पष्ट केले पाहिजे.

जातीचे लेबल पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रामध्ये चिटकवण्याचा प्रयत्न सरकारने करता कामा नये, अशा शब्दांत अजित पवार यांनी सरकारवर वार केला. त्यानंतर पृथ्वीराज चव्हाण, नाना पटोले हेही आक्रमक झाले. त्यांना वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनीही तितक्याच आक्रमकतेने प्रत्युत्तर दिले. तरीही गोंधळ थांबेना. तेव्हा खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच यावर स्पष्टीकरण दिले. त्यानंतर गोंधळ थांबला.



### नेमका प्रकार काय आहे?

हा प्रकार सांगली जिल्ह्यात सर्वप्रथम उघडकीस आला आहे. रासायनिक खत खरेदीसाठी जेव्हा शेतकरी खतविक्रेत्यांकडे जातो; तेव्हा ई पॉस मशीनवर शेतकऱ्याचे नाव, गाव, पत्ता, मोबाईल नंबर, आधार नंबर आदी माहिती भरावी लागत होती. मात्र ६ मार्चपासून ई पॉस मशीनचे सॉफ्टवेअर अपडेट करण्यात आले असून त्यात आता जातीचा रकाना नव्याने जोडण्यात आला आहे. या रकान्यात जातीची माहिती भरल्यानंतरच ई पॉसची प्रक्रिया पूर्ण होते आणि खत खरेदी करता येते. जातीचा रकाना रिकामा सोडल्यास खरेदीची प्रक्रियाच पूर्ण होत नाही.

### कृषी विभागाचे स्पष्टीकरण

ही जात नाही तर वर्गवारी आहे. केंद्र सरकारने पॉस मशीनचे नवीन ३.२ सॉफ्टवेअर अपडेट केले आहे, त्यात वर्गवारी हा घटक आहे. कुणाचीही जात विचारली जात नाही. जात पाहून खत दिले जात असल्याची बातमी खरी नाही. उलट प्रत्येक वर्गवारीला लाभ मिळतो की नाही, हे पाहण्यासाठी केवळ वर्गवारी दिली आहे. जनरल, एसी, एसटी, ओबीसी अशा वर्गवारी त्यात आहेत. केवळ याचा सर्वांना लाभ मिळावा, हा हेतू आहे, असे स्पष्टीकरण कृषी विभागाकडून देण्यात आले आहे.



शेतकऱ्यांना अशाप्रकारे जात विचारणे हे चुकीचे आहे. आजपर्यंत देशाच्या किंवा राज्याच्या इतिहास असा प्रकार घडला नव्हता. जर शेतकऱ्यांना जात विचारली जात असेल तर याचे कारण काय? हे पुढे आले पाहिजे. यासंदर्भात माहिती आम्ही घेतो आहे.

**- शरद पवार (माजी केंद्रीय कृषी मंत्री)**



शेवटी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी यासंदर्भात उत्तर दिलं. ते केंद्र सरकारचं पोर्टल आहे. आपण केंद्राला जातीचा रकाना वगळण्यात यावा असं कळवत आहोत. काल शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण जे सकारात्मक निर्णय घेतले त्यामुळे विरोधकांच्या भ्रमाचा भोपळा फुटला. त्यामुळे त्यांच्याकडे काही राहिलं नाह.

**- एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री)**



सॉफ्टवेअरमध्ये करण्यात आलेला बदल फक्त सांगलीसाठी करता येणे शक्य नाही. हा बदल केंद्र सरकारच्या आदेशाने करण्यात आलेला आहे. नेमका हा आदेश का देण्यात आला? जातीपातीला प्रोत्साहन दिले जातेय का?

**- पृथ्वीराज चव्हाण (माजी मुख्यमंत्री)**



मुनगंटीवार म्हणाले की राईचा पर्वत केला जातोय. त्यांनी मान्य केले की केंद्राने तसे आदेश दिले, त्यात आम्ही सुधारणा करतोय. खत घेण्यासाठी शेतकऱ्याची जात विचारली जातेय आणि मंत्री म्हणतायत की तुम्ही राईचा पर्वत करताय? तुम्हाला काहीतरी वाटले पाहिजे.

**- नाना पटोले (आमदार व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष)**

---

एमपीएससीकडून परिपत्रक जारी

## शासकीय नोकरीसाठी आता वयोमर्यादा शिथिल....

सुराज्य/सोलापूर

एमपीएससीकडून ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींमध्ये उमेदवाराची वयोमर्यादा संपुष्टात आल्यास विहित कमाल वयोमर्यादेमध्ये दोन वर्षाची शिथिलता देण्यात येणार आहे. या संदर्भात एमपीएससीने आज परिपत्रक जारी केले आहेत. ज्या उमेदवारांची वयोमर्यादा संपुष्टात आली आहे अशा उमेदवारांना ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी विहित कमाल वयोमर्यादेमध्ये दोन वर्षाची शिथिलता देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे. ३ मार्च रोजी राज्य सरकारकडून याबाबतचे परिपत्रक काढण्यात आले आहे. त्यानंतर आज महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून याबाबतचे परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

विविध कारणामुळे पुरेशा जाहिराती प्रसिद्ध न झाल्याने ज्या उमेदवारांना परीक्षांना बसण्याची संधी प्राप्त झाली नाही आणि त्यांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशा उमेदवारांना परीक्षांना बसण्याची संधी प्राप्त व्हावी, यासाठी २ मार्च




२०२३ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या शासन निर्णयाद्वारे ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी विहित कमाल वयोमर्यादेमध्ये दोन वर्षाची शिथिलता देण्याबाबत शासनाकडून निर्णय घेण्यात आला आहे.

कोरोना महामारीमुळे दोन वर्ष राज्यात सरकारी नोकरभरती झाली नव्हती. त्यामुळे वय संपलेल्या विद्यार्थांना आता अर्ज करता येत नव्हते. त्यामुळे वय संपलेल्या विद्यार्थ्यांनी वयाची मर्यादा शिथिल करण्याची मागणी केली होती. राज्य सरकारने २ मार्च २०२३ रोजी याबाबतचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत परिपत्रक जारी करून वयाची मर्यादा शिथिल केल्याचे जाहीर केले आहे. सरळ सेवेत भरल्या जाणाऱ्या पदांमध्ये भरतीसाठी वयोमर्यादेत दोन वर्ष वाढवून देण्यात आले आहे. सरकारी नोकरीच्या शोधात असणाऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

## टॅक्स विभागाचे कर्मचारी असल्याची थाप; भामट्यांनी साडेबारा तोळे सोने लांबवले

सुराज्य/सोलापूर

महानगरपालिकेच्या टॅक्स विभागाचे कर्मचारी असून घराचे मेजरमेंट घ्यायचे आहे, अशी बतावणी करून वृद्ध दाम्पत्याच्या घरातील उघड्या कपाटातील साडेबारा तोळे सोने दोघा भामट्यांनी दिवसाढवळ्या चोरून नेले. ही घटना शुक्रवारी दमाणी नगरातील गडदर्शन सोसायटीमध्ये राहणाऱ्या दिनेश सुरवसे या सेवानिवृत्त प्राध्यापकाच्या घरी घडली.

या प्रकरणी दिनेश सुरवसे यांचे चिरंजीव अभिजित सुरवसे यांनी फौजदार चावडी पोलिसात तक्रार दाखल केली आहे. शुक्रवारी सकाळी एका काळ्या रंगाच्या दुचाकीवर दोन अज्ञात इसम गडदर्शन सोसायटीमध्ये आले.



ते दिनेश ऊर्फ धोंडिबा सुरवसे यांच्या घराकडे गेले. घरामध्ये सेवानिवृत्त प्राध्यापक दिनेश सुरवसे आणि त्यांच्या पत्नी होत्या. दोघा भामट्यांनी त्यांना आपण महापालिकेच्या टॅक्स विभागाचे कर्मचारी असून घराचे मेजरमेंट घ्यावयाचे असल्याचे सांगून त्यांना बोलण्यात गुंतवले. एकाने त्यांना पावत्यांची फाईल घेऊन घराच्या बाहेर बोलवले तर दुसऱ्याने थेट आतल्या घरातील उघड्या कपाटातून सोने ठेवलेली पर्स घेतली आणि त्यानंतर काम फत्ते करून ते दोघेही घराच्या बाहेर पडले. त्यानंतर संशय आलेल्या दिनेश सुरवसे यांनी आतल्या खोलीत जाऊन कपाट पाहिले असता त्यातील सोन्याची पर्स त्यांना दिसली नाही. त्सात साडेबारा तोळे सोने होते. चोरी झाल्याचे लक्षात येताच सुरवसे यांनी तत्काळ फौजदार चावडी पोलिसात फिर्याद दिली.

फौजदार चावडीचे पोलीस अधिकारी उदयसिंह पाटील आणि सतीश भोईटे तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक व अन्य पोलीस पथकाने घटनास्थळी भेट दिली. गडदर्शन सोसायटीसह दमानी नगर भागातील काही सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी तपासले.

## अज्ञात व्यक्तीने सासुरवाडीला आलेल्या जावयाची कार पेटवली, सात लाखांचे नुकसान

सांगोला : अज्ञात कोणीतरी व्यक्तीने सासुरवाडीला आलेल्या जावयाची कार पेटवून दिली या आगीत कारचे जळून सुमारे ७ लाख रुपयाचे नुकसान झाले. ही घटना ८ मार्च रोजी मध्यरात्री १२ च्या सुमारास मार्डी ता उत्तर सोलापूर येथील गावातील नागनाथ मंदिराजवळ घडली. याबाबत, ज्ञानेश्वर लिगाडे (रा. सांगोला जि. सोलापूर) यांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फिर्याद दिली आहे.

सांगोला येथील अरुण ऊर्फ ज्ञानेश्वर लिगाडे हे कुटूंबास मंगळवार ७ मार्च रोजी दुपारी अडीच सुमारास एम एच -४५-एक्यू-४०२५ या कारमधून मार्डी ता.उत्तर सोलापूर येथील सासरे सुनील मुडके यांच्या घरी आले होते. दरम्यान दुसऱ्या दिवशी ८ मार्च रोजी त्यांनी कुटुंबासह तुळजापूर येथे देवदर्शन केले.देवदर्शन करून परत आल्यानंतर सायंकाळी ६ च्या सुमारास सदर कार सुनील मुडके यांच्या घराचे बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत लावली होती. रात्री जेवण झाल्यावर सर्वजण घरात झोपले होते हीच संधी साधून अज्ञात कोणीतरी व्यक्तीने रात्री ११:४५ च्या सुमारास त्याची कार पेटवली. गावातील आबा सुरवसे यांनी सदरची घटनेची माहिती सुनील मुंडके यांना दिली त्यांनी झोपेतून उठून घरातून बाहेर येऊन पाहिले असता गाडी पेटलेल्या अवस्थेत निदर्शनास आली. नातेवाईकांसह इतरांच्या मदतीने त्यांनी पेटलेल्या गाडीवर पाणी फवारून गाडी विजवली.या आगीत कारचे जळून सुमारे ७ लाख रुपयाचे नुकसान झाले आहे. तपास एएसआय श्रीमती शारदा घोळवे करीत आहेत.

## खलिस्तान समर्थक ६ युट्यूब चॅनेल ब्लॉक

पंजाब : पंजाबमध्ये हिंसा भडकावण्याचा प्रयत्न करणाऱ्या खलिस्तान समर्थक सहा धीर्ढीलश चॅनलला सरकारने ब्लॉक केले आहे. खलिस्तान समर्थक माहिती पसरवाणाऱ्या सहा चॅनलला सरकारच्या सूचनेनंतर ब्लॉक करण्यात आले आहे. खलिस्तानी समर्थक हिंसा भडकवण्याचा प्रयत्न करत होते. माहिती आणि प्रसारण सचिव अपूर्वा चंद्रा म्हणाले की, मागील दहा दिवसांत विदेशातून चालवण्यात येणारे सहा ते सात YouTube चॅनल ब्लॉक करण्यात आले.






## एमआयडीसी भागातील दोन घरांना लागली आग

सुराज्य/सोलापूर

शहरातील आकाशवाणी केंद्र परिसरात असलेल्या लक्ष्मीनारायण थिएटर एमआयडीसी भागातील दोन घरांना अचानक आग लागली.या आगीमुळे परिसरात धुराचे लोळ मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत.आग विझविण्यासाठी अग्निशामक दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून,आग विझविण्याचे काम वेगात सुरू होते.

दरम्यान, आग विझविण्यासाठी परिसरातील लोकही मोठ्या प्रमाणात मदत करीत आहे.आगीच्या परिसरातच महावितरणचा डीपी बॉक्स आहे.मात्र महावितरणने खबरदारी म्हणून या भागातील विद्युत पुरवठा बंद केला. घटनास्थळावर अग्निशामक दलाचे वरिष्ठ अधिकारी,शहर पोलिस दलातील अधिकारी दाखल झाले.

या आगीत घरातील संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती देण्यात आली आहे.मागील काही दिवसांपासून शहरात आगीच्या घटना वारंवार घडत आहे. अक्कलकोट एमआयडीसी भागातील कारखान्यांनाही आगी लागल्याच्या घटना ताज्या आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या बोगस डॉक्टरांना एवढा कॉन्फिडन्स येतो कुठून?

कल्याण
367-61-470

मेन बाजार
268-65-339

## माझी वसुंधरा अभियानाच्या बक्षिसातून तीन बागांचे होणार सुशोभिकरण

### महापालिकेकडून डीपीआर तयार; सोलर पॅनल आणि एलईडीही बसवणार

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेला मिळालेल्या माझी वसुंधरा अभियानाच्या २ कोटी रुपये बक्षिसाच्या रकमेतून शहरातील ३ बागा विकसित करणे तसेच एलईडी लाईट व सोलर पॅनल बसविण्यात येणार आहे. त्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मंजुरीसाठी तो शासनाकडे पाठविण्यात येत आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली.

शासनाच्या माझी वसुंधरा अभियानांतर्गत मागील वर्षी सोलापूर महापालिकेचा पुणे विभागात प्रथम क्रमांक आला होता. त्यासाठी महापालिकेला दोन कोटींचे बक्षीस जाहीर झाले आहे. या बक्षिसाच्या रकमेतून सोलापूर शहरातील तीन बागा विकसित करण्यात येणार आहेत. यामध्ये माटे बाग, मुदगल गार्डन व साधू वासवानी बाग या तीन



बागांचा समावेश आहे. निराळे वस्ती येथील माटेबागेसाठी ४० लाख २५ हजार रुपये, अशोक चौक नजीकच्या मुदगल गार्डनमध्ये विविध कामासाठी २४ लाख ५ हजार रुपये, गुरुनानक चौक येथील साधू वासवानी बागेमध्ये ३५ लाख १२ हजार रुपये निधीतून बाग विकसित करण्यात येणार आहे. यामध्ये डागडुजी व दुरुस्ती, हिरवळ, मुलांसाठी खेळणी यासह विविध कामे करण्यात येणार आहेत. उर्वरित एक कोटीच्या निधीमधून उद्यान परिसरांमध्ये एलईडी लाईट व सोलर पॅनल बसविण्यात येणार आहे. एकूण १ हजार ८६८ एलईडी लाईट बसविण्यात येणार आहेत तसेच एचएसआर येथे सोलर पॅनल बसविण्यात येणार असून त्याची क्षमता १३७ किलो वॅटची राहणार आहे.

#### पावसाळ्यापूर्वी कामे सुरू होतील : घोलप

या कामाचा सविस्तर प्रकल्प आराखडा महापालिकेने तयार केला आहे. तो मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. मंजुरीनंतर या कामाचे टेंडर काढण्यात येईल. एकूण सुमारे एक कोटी निधीतून या तिन्ही बागा उत्कृष्ट पद्धतीने विकसित करण्यात येणार आहेत. त्यानंतर साधारणता: पावसाळ्यापूर्वी ही कामे सुरू होतील, अशी माहिती महापालिकेचे उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांनी दिली.